सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
त्रिशूल गोल्ड फिल्ड इमारत, प्लॉट नंबर ३४, सरोवर विहार समोर, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई ४००६१४.
Email Id: contact-secretary@mpsc.gov.in Website: https://mpsc.gov.in, https://mpsconline.gov.in
@mpsc_office @official_mpsc ०२२-६९३८५९००

क्रमांक :- एमआयएस-०१२२/प्र.क्र.४२/२०२६/३१ दिनांक : २५ ऑगस्ट, २०२६

## प्रसिद्धीपत्रक

आयोगामार्फत औषध निरीक्षक, गट-ब, अन्न व औषध प्रशासन या संवर्गासाठी दिनांक २९ जुलै, २०२५ रोजी जाहिरात क्रमांक ११६/२०२५ प्रसिद्ध करण्यात आली होती. दिनांक २२ मार्च, २०२६ रोजी ही चाळणी परीक्षा ऑफलाईन पद्धतीने राज्यातील ६ विभागीय मुख्यालयाच्या ठिकाणी परीक्षा केंद्रांवर घेण्यात आली. सदर परीक्षेचा दिनांक १२ जून, २०२६ रोजी निकाल जाहिर करण्यात आला. चाळणी परीक्षेअंती मुलाखतीकरिता ५०६ इतके उमेदवार पात्र ठरले. यापैकी ४८८ उमेदवारांच्या मुलाखती दिनांक ०१ जुलै, २०२६ ते २२ जुलै २०२६ या कालावधीत घेण्यात आल्या. दिनांक २२ जुलै, २०२६ रोजी सायंकाळी मुलाखती संपल्यानंतर औषध निरीक्षक पदाकरिता पात्र ठरणाऱ्या ४८५ व अपात्र ०३ अशा एकूण ४८८ उमेदवारांची तात्पुरती सर्वसाधारण गुणवत्ता यादी आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली.

२. दरम्यान उपरोक्त दिनांक २२ मार्च २०२६ रोजीच्या चाळणी परीक्षेमध्ये गैरप्रकार झाल्याबाबत आयोगास दिनांक २२ ते २६ जुलै, २०२६ या कालावधीत ईमेलद्वारे काही उमेदवारांमार्फत तसेच लोकप्रतिनिधींकडून तक्रारी प्राप्त झाल्या. परीक्षा सुरू होण्यापूर्वी म्हणजेच दिनांक २० मार्च, २०२६ रोजी काही उमेदवारांना प्रश्नपत्रिका/प्रश्न मिळाले होते आणि ही प्रश्नपत्रिका सोशल मीडिया/इलेक्ट्रॉनिक माध्यमांद्वारे प्रसृत करण्यात आली होती असे सदर तक्रारींमध्ये नमूद करण्यात आले होते.

३. आयोगामार्फत तातडीने उपरोक्त प्राप्त तक्रारीतील आशयाचे गांभीर्य आणि प्रकरणाची संवेदनशिलता विचारात घेऊन, प्राप्त सर्व तक्रारींच्या अनुषंगाने चौकशी करण्यासाठी पोलीस आयुक्त, मुंबई यांच्याकडे दिनांक २७ जुलै, २०२६ रोजी तक्रार दाखल करण्यात आली.

४. तद्नुषंगाने पोलीस उपआयुक्त (गुन्हे अन्वेषण शाखा), पोलीस आयुक्त कार्यालय, मुंबई यांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगास प्राथमिक चौकशी अहवाल सादर केला आहे. गुन्हे अन्वेषण शाखेने सादर केलेल्या अहवालानुसार एकाच उमेदवारास प्रश्नसंच मिळाल्याचे आणि त्याचा लाभ झाल्याचे चौकशीत दिसून येत आहे, असा प्रथमदर्शनी निष्कर्ष नोंदविला आहे.

५. आयोगाद्वारे आयोजित केल्या जाणाऱ्या परीक्षेची गोपनीयता, अखंडता, पारदर्शकता, निष्पक्षता व आयोगावरील सर्वसामान्य उमेदवारांची विश्वासार्हता कायम राखण्याच्या दृष्टीने, आयोगाने अन्न व औषध प्रशासन विभागातील औषध निरीक्षक, गट-ब या पदासाठी उपरोक्त जाहिरातीप्रमाणे केलेली भरती प्रक्रिया रद्द करण्याचा आज निर्णय घेतला आहे.

६. औषध निरीक्षक, गट-ब, अन्न व औषध प्रशासन या संवर्गाच्या उपरोक्त जाहिरातीतील पदांसाठी आयोगाकडून फेरपरीक्षा आयोजित करण्यात येईल. याकरिता संबंधित उमेदवारांना पुन्हा अर्ज करण्याची आवश्यकता असणार नाही. तसेच त्याकरिता कोणतेही परीक्षा शुल्क आकारण्यात येणार नाही. फेरपरीक्षेसंदर्भातील प्रसिध्दीपत्रक स्वतंत्रपणे जाहीर करण्यात येईल.

( महेंद्र हरपाळकर )
सचिव
महाराष्ट्र लोकसेवा आयोग.

स्थळ : नवी मुंबई